पुढारी

# कृषी विद्यार्थी घेताहेत शेतीचा अनुभव

## डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाचा 'ग्रामीण कृषी कार्यानुभव' उपक्रम

**मडगाव : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेले ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहाचवून त्यांना प्रगत करण्यासाठी स्वतः शेतीत जाऊन प्रत्यक्ष शेतीत काम करण्याचा अनुभव घेतला. सुळकर्णा येथील डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाने यंदापासून विद्यार्थ्यांसाठी 'ग्रामीण कृषी कार्यानुभव' असा अनोखा उपक्रम सुरू केला असून याद्वारे विद्यार्थी शेतात जाऊन काम करत आहेत.





**पिर्ला : 'ग्रामीण कृषी कार्यानुभव' उपक्रमात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारा कृषी महाविद्यालय विद्यार्थ्यांचा एक गट. दुसऱ्या छायाचित्रात पाण्यात अजोला वनस्पतीचे उत्पादन घेण्यासाठी केलेली सोय.**

या उपक्रमाअंतर्गत कृषी महाविद्यालयात शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी पुढील चार महिने गावांमध्ये राहून शेतकऱ्यांना प्रगत शेती कशी करावी, हे विविध प्रात्यक्षिके करून दाखविणार आहेत.

चौथ्या वर्षाच्या वर्गात शिकत असलेल्या एकूण ३८ विद्यार्थ्यांचे मुलामुलींचे सहा गट तयार करण्यात आले असून दक्षिण गोव्यातील नेत्रावळी, रिवण, जांबावली, पिर्ला आणि मळकर्णे या कृषिप्रधान गावांत सदर गट मार्गदर्शन करणार आहेत.

शेतकऱ्यांच्या पीक उत्पादन वाढीसाठी माती परीक्षण, पीक लागवडीच्या नवीन पद्धती, नवीन बियाणे, सेंद्रिय शेती, खत व कीडनाशकांचा योग्य वापर, माती परीक्षण, कीड रोग नियंत्रण, गांडूळ खत आदी प्रात्यक्षिके विद्यार्थी शेतकऱ्यांबरोबर राहून करणार आहेत.

जून महिन्यापासून सदर उपक्रमाला सुरुवात करण्यात आली असून पुढील चार महिने गावांमध्ये राहण्यासाठी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी राहण्याची आणि खाण्यापिण्याची व्यवस्था केल्याची माहिती कृषी प्राध्यापक सतीश पाटील यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली.

चार महिने शेतकऱ्यांच्या बरोबर राहिल्यानंतर विद्यार्थ्यांना पुढील एक महिना कृषी वसाहतीत काम करण्याची संधी मिळणार आहे. एकूण पाच महिने पूर्ण झाल्यावर विद्यार्थी आपला अहवाल तयार करणार असून त्यांनतर उपक्रम पूर्ण होणार आहे, असे पाटील यांनी सांगितले.

सुळकर्णा येथील डॉन बॉस्को महाविद्यालय हे २०१५-१६ या शैक्षणिक वर्षांपासून सदर विद्यालय सुरू करण्यात आलेले गोव्यातील पहिलेच कृषी महाविद्यालय आहे. कृषी अभ्यासक्रम हा इंजिनिअरिंग किंवा मेडिकल अभ्यासक्रमाच्या पातळीचाच अभ्यासक्रम असून सदर अभ्यासक्रमातही पदवीपर्यंत शिक्षण घेता येते, असे कृषी शिक्षक पाटील यांनी सांगितले.

ज्या मुलांना शेतीमध्ये आवड आहे, ज्यांची स्वतःची शेती आहे, ज्या विद्यार्थ्यांना प्रगत शेती करण्याची इच्छा आहे अशाच मुलांना बारावीनंतर कृषी महाविद्यालयात प्रवेश घेण्यास प्रोत्साहन दिले जाते. आजच्या युगात बहुतेक मुले नोकरीच्या मागे धावत असतात.